जावक क्र. 371/२६
जिल्हा न्यायालय, वाशिम
दिनांक 20/01/२६

वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांचे कार्यालय

जाहीर प्रगटन

विषय:— साहित्य खरेदी करण्याकरिता दरपत्रक मागविणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, जिल्हा न्यायालयाच्या दैनंदिन कार्यालयीन कामकाजाकरिता तसेच स्वच्छतेकरिता आवश्यक असणारे साहित्य खालील प्रमाणात खरेदी करण्यासाठी त्याखाली नमुद असलेल्या अटी व शर्तीवर दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

अ.क्र.	वस्तुचे विवरण	प्रमाण/नग
१	झेरॉक्स कागद A4 साईझ (७० gsm)	३०० रिम
२	गम बॉटल (२००ml)	५० नग
३	स्टॅपलर पिन (१० नं)	३ बॉक्स
४	पेन (काळे, निळे व लाल— प्रत्येकी ५०)	१५० नग
५	लिफाफे (१०.५"X १४")	५० नग
६	लेस(३ फुट)	२० बंडल
७	धागा(५०ग्रॅम)	५० बंडल
८	स्टॅपलर (१० नं)	६ नग
९	फिनाईल(१ लिटर नग)	१५ लिटर
१०	टॉयलेट क्लिनर(१ लिटर नग)	१५ लिटर
११	ॲसिड(१ लिटर नग)	१५ लिटर
१२	लाख(१० कांडयाचा बॉक्स)	१० बॉक्स
१३	सेलोटेप (२", ५०मी)	२० नग
१४	टॅग	५० बंडल
१५	स्प्रिंग फाईल	१०० नग
१६	पुठ्ठा फाईल	५० नग
१७	लेस फाईल	५० नग
१८	रजिष्टर(A4 साईझ २८८ पेजेस)	६ नग

१. खरेदी केलेल्या साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यापासुन ७ दिवसांच्या आत जिल्हा न्यायालय, वाशिम येथे करणे बंधनकारक राहील.

२. खरेदी करण्यात आलेल्या साहित्यामध्ये काही त्रुटी आढळुन आल्यास सदरहु साहित्य तात्काळ बदलवुन देणे अनिवार्य राहील.

३. खरेदी केलेल्या साहित्याच्या देयकाचे प्रदान हे अदाता नोंदणी पध्दतीद्वारे सरळ अदात्याचे बॅक खात्यात जमा करण्यात येईल.

४. खरेदी करण्यात येणारे साहित्य उपरोक्त प्रमाणे नमुद असलेल्या आकार, प्रमाण, नगात व चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे.

५. मेलव्दारे तसेच बंद लिफाफ्यामध्ये नसलेले दरपत्रक खरेदी प्रक्रियेसाठी गृहित धरण्यात येणार नाही

दरपत्रक धारकाने उपरोक्त साहित्याच्या खरेदीकरिता आपले दरपत्रक सर्व किंमती, कर, सुट व अटींसह दिनांक ३०/०१/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी वि. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांचे नावे या कार्यालयास बंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. तसेच बंद लिफाफ्यावर **'साहित्य खरेदी दरपत्रक'** असे ठळक अक्षरात नमुद करावे.

तसेच प्राप्त झालेले दरपत्रक कोणतेही कारण न दाखविता नामंजुर करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, वाशिम यांना राहील.

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, वाशिम

दिनांक:—२०/०१/२०२६

प्रति,

१. संगणक विभाग, जिल्हा न्यायालय, वाशिम (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी)
२. अधिक्षक (वित्त व प्रशासन), जिल्हा न्यायालय, वाशिम (नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी)